**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी यंत्रणा विकसित करणं सुरू असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडून पुनरुच्चार
- देशातल्या शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी जोरदार तेजी, सेन्सेक्समधे ८६२ अंकांची वाढ

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाची संपूर्ण देशभरातून माघार

**<><><><><>**

भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारनं शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं आहे, असा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. नवी दिल्लीत ते आज प्रत्यार्पण आव्हाने आणि रणनीती संबंधीच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी एक मजबूत यंत्रणा विकसित केली जात असल्याचं ते म्हणाले. या परिषदेविषयी शहा म्हणाले....

**होल्ड.. बाईट-अमित शहा**

सरकारनं २०१८मध्ये फरार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देणारा फरार आर्थिक गुन्हेगार कायदा आणल्यानंतर पुढच्या चार वर्षांत दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम वसूल झाली आहे. मनी लाँड्रिंग कायदेही मजबूत केले असून त्यामुळे २०१४ ते २०२३ या दरम्यान १२ अब्ज अमेरिकन

डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली असल्याचं त्यांनी सांगितलं सीबीआयनं ही दोन दिवसांची परिषद आयोजित केली आहे.

या परिषदेत विविध केंद्रीय आणि राज्य पोलीस संस्थांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

देशात संरक्षण उत्पादन निर्मितीसाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांचं फळ ऑपरेशन सिंदूरच्या रुपातून भारताला मिळाल्याचे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले आहेत. पुण्यात सिम्बॉयसिस स्किल अँड प्रोफेशनल विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. गेल्या १० वर्षात संरक्षण उत्पादन ४६ हजार कोटींवरुन दीड लाख कोटींच्या वर गेलं आहे. त्यात खासगी क्षेत्राचं योगदान ३३ हजार कोटी रुपयांचं आहे, असं ते म्हणाले. २०२९ पर्यंत देशांतर्गत संरक्षण उत्पादन ५० हजार कोटी रुपयांच्या वर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करायला हवं असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पुन्हा व्यक्त केलं. ते नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत विचारलं असात महाविकास आघाडीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला घेऊन मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत फारसा फायदा होणार नाही असं आठवले म्हणाले.

मुंबईत ४० टक्के मराठी मतदारांचा कौल हा महायुतीला मिळणार असून २० टक्के मतं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना मिळू शकतील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. येत्या ८ मार्चला आरपीआयचं राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

चंद्रपूर इथं धम्मदीक्षा अनुप्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमातही आठवले सहभागी झाले. नेते एकत्र आले तरी जनता एकत्र येत नाही हीच रिपब्लिकन ऐक्यातली सर्वात मोठी समस्या असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोठ्याप्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिले. या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात मुंबईत निवडणूक आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचं तसंच कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीनंही आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आश्वासन मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरीतल्या शिवसेनेच्या तीन हजार बूथप्रमुखांना मेळाव्यात मार्गदर्शन केलं. तसंच रत्नागिरीत उभारलेल्या कोकणातल्या सहा भारतरत्नांच्या शिल्पांचं अनावरणही त्यांनी केलं.

शहरातल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे तारांगणाच्या प्रांगणात ही शिल्पं उभारली असून, मोडीत काढलेल्या वाहनांच्या सुट्या भागांपासून जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी ती साकारली आहेत. महर्षी धोंडो केशव कर्वे, महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे, भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर या सहा भारतरत्नांची ही शिल्पं आहेत.

**<><><><><>**

**बृहन्मुंबई**, नवी मुंबई आणि ठाणे या महानगरपालिकांच्या, तसंच या महापालिकाच्या अंतर्गत येणाऱ्या इतर संस्थांमधल्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्मचारी, तसंच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ३१ हजार रुपये अनुदान दिलं जाणार आहे. तर आरोग्य स्वयंसेविकांना १४ हजार, आणि बालवाडी शिक्षिका-मदतनीस यांना ५ हजार भाऊबीज दिली जाईल.

**नवी मुंबई** महानगरपालिकेच्या कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना ३४ हजार ५०० रुपये, आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना २८ हजार ५०० रुपये सानुग्रह अनुदान दिलं जाणार आहे.

तर **ठाणे** महानगरपालिकेतल्या कर्मचाऱ्यांना २४ हजार ५०० रुपये सानुग्रह अनुदान मिळेल.

<><><><><>

अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून दर कपातीची अपेक्षा, जागतिक बाजारातलं सकारात्मक वातावरण यामुळं सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी होती. सकाळपासून असलेली तेजी दुपारपर्यंत आणखी वाढत गेली. दिवसअखेर सेन्सेक्स ८६२ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ४६८ अंकांवर बंद झाला. निफ्टी सुमारे २६२ अंकांनी वधारुन २५ हजार ५८५ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

संपूर्ण देशातून नैऋत्य मौसमी पावसाचा परतीचा प्रवास आज पूर्ण झाला. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, रायलसीमा, दक्षिण कर्नाटक आणि  केरळ-माहे या भागांत ईशान्य मान्सून पावसाळ्याची सुरुवात झाली आहे. पुढील सात दिवसांत या ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

<><><><><>

श्रोते हो, नक्षलवादी चळवळीतला मोठा नेता भूपती यानं काल गडचिरोली आत्मसमर्पण केलं. भूपतीचे आत्मसमर्पण, देशातल्या नक्षल चळवळीवर त्याचा होणारा परिणाम यासंदर्भात नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील यांची विशेष मुलाखत आज आपण संध्याकाळी सव्वा ७ वाजता वृत्त विशेष कार्यक्रमात ऐकू शकता.

<><><><><>

सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेबाबत जागरूक राहणं ही काळाची गरज आहे. शासन, प्रशासन आणि सर्वसामान्य नागरिकांनी अद्ययावत राहणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केलं. माहिती तंत्रज्ञान संचालनालय आणि नॅशनल

इन्फॉर्मेटिक्स सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित  सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेत ते बोलत होते.

महाराष्ट्र हे ‘कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम’ स्थापन करणारं पहिलं राज्य ठरल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या क्रीडा धोरणाच्या  धर्तीवर राज्याचं क्रीडा धोरण तयार करण्यासाठी समिती स्थापनेसाठीचे प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी आज दिले. राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत मंत्रालयात घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**<><><><><>**

चंद्रपूर दीक्षाभूमीवर ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळा  पार पडला. दर वर्षी १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी हा दोन दिवसीय सोहळा चंद्रपूर इथल्या दीक्षाभूमीवर साजरा केला जातो. यातील पहिल्या दिवशी अनुप्रवर्तन सोहळ्याचे विधिवत उद्घाटन झालं. तर दुसऱ्या दिवशी मुख्य सोहळा मिरवणूक, परिसंवाद, सामूहिक बुद्धवंदना, भीम गीतांच्या कार्यक्रमाचं  आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी बँकेतल्या १७ कोटी ७४ लाख रुपयांच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी माजी मंत्री प्रशांत हिरे आणि माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांच्यासह त्यांच्या कुटुंबाविरोधात नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रशांत हिरे यांचा मुलगा डॉ. अपूर्व हिरे सध्या भाजपात असून त्यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राजकीय द्वेषापोटी गुन्हा दाखल केल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय जनता पार्टी दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यभर ‘पालावर दिवाळी’ हा सामाजिक उपक्रम राबवणार आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याकाळात विदर्भात हवामान कोरडं राहील.